पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
।। विद्यया संपन्नता ।।
NAAC Accredited 2015
'B' Grade (CGPA -2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगाव सोलापूर
ईपीएबीएक्स ०२१७ -२७४४७७८ (११ लाईन्स) विस्तृत क्र २२५ फॅक्स-०२१७-२७४४७७०
: http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in Email; dsw@sus.ac.in



### विद्यार्थी विकास विभाग/Department of Student Development

जावक्र पुआहोसोविसो/विद्यार्थी विकास/२०२३-२४/ 5728 दि. 4 SEP 2023

प्रति,

**मा. प्राचार्य, मा संचालक**
सर्व संलग्न महाविद्यालये, सर्व सकुल,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय:- युवा महोत्सव २०२३- २४ (उन्मेष सृजनरंगाचा) आयोजनाबाबत...**

**संदर्भ:- पुआहोसोविसो/विद्यार्थी विकास/२०२२-२३/५६५०/दि.३१/०८/२०२३**

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाचा १९ वा युवा महोत्सव (उन्मेष सृजनरंगाचा) दि. १० ते १३ ऑक्टोबर २०२३ दरम्यान **स्वेरीज अभियांत्रिकी महाविद्यालय, गोपाळपूर, पंढरपूर** येथे संपन्न होत आसल्याबाबत तसेच युवा महोत्सव आयोजनाची नियमावली नंतर पाठविण्याबाबत आपणास उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले होते. तरी नियमावली सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. त्यास अनुसरून खालील सूचनांचे महाविद्यालयांनी पालन करावे.

१ युवा महोत्सवाच्या नियमावली मध्ये काही बदल करण्यात आले असून विद्यापीठाचे संकेतस्थळ **sus.ac.in** व http://su.digitaluniversity.ac वर उपलब्ध आहे. त्याचे बारकाईने निरीक्षण करून पालन करावे.

२ सन २०२३-२४ या वर्षापासून युवा महोत्सवात **सांघिक कलाप्रकारामध्ये पाश्चिमात्य समुह गायन तसेच वैयक्तीक कलाप्रकारामध्ये पाश्चिमात्य गायन, पाश्चिमात्य वाद्य संगीत व मेहंदी अशा चार** कलाप्रकाराचा समावेश करण्यात आला असून त्याचे नियम व तपशिलवार माहिती विद्यापीठाच्या नियमावलीमध्ये देण्यात आली आहे.

३ युवा महोत्सवात २ संघव्यवस्थापक तसेच ३ व्यावसायिक साथीदार व विद्यार्थी असे एकुण ४५ कलाकारांना सहभागी सहभागी करून सर्व महाविद्यालयांनी संघाची उभारणी करावी.

४ **सन २०२३-२४ या वर्षासाठी युवा महोत्सवात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांची वयोमर्यादा सादरीकरणाच्या वेळी २५ इतकीच असावी.**

५ **विद्यार्थी २ संघव्यवस्थापक तसेच ३ व्यावसायिक साथीदार असे एकुण ४५ कलाकारांच्या प्रवेशिका, यादी व सोबत जोडल्याप्रमाणे प्राचार्यांनी प्रमाणित केलेले हमीपत्र विद्यापीठाकडे पाठविण्यात यावेत व सहभागी विद्यार्थ्यांच्या जन्मदाखल्यासह सर्व माहिती खालील पत्त्यावर यजमान महाविद्यालयाकडे पाठवावी.**

६ **सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र द्यावयाचे असल्याने व यजमान महाविद्यालयास निवासाची सोय करावयाच्या दृष्टीने सहभागी ४५ चमुची यादी पीआरएन नंबर सह सॉफ्टकॉपी व हार्डकॉपी प्रवेशिकेसोबत दि.०४/१०/२०२३ पर्यंत विद्यार्थी विकास विभागाकडे देणे अनिवार्य आहे. त्याशिवाय महाविद्यालयांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार नाहीत. विहित कालावधीनंतर आलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीचा, सहभाग प्रमाणपत्र देण्यासाठी विचार केला जाणार नाही.**

७ महोत्सवात प्रवेश फी म्हणून सांघिक फी रू १००/- व वैयक्तिक फी रू ५०/- इतकी ठेवण्यात आली आहे.

८ युवा महोत्सवात संघाची नोंदणी करतेवेळी प्रत्येक महाविद्यालयाच्या संघानी मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र रू १०००/- अनामत रक्कम Security Deposit यजमान महाविद्यालयांकडे जमा करावयाची आहे. सदरची रक्कम आपणास युवा महोत्सव संपल्यानंतर परत करण्यात येईल.

९ युवा महोत्सवादरम्यान किंवा संपल्यानंतर संघातील विद्यार्थी यजमान महाविद्यालयाचे नुकसान करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यास अनुसरून विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे नुकसानदायक कृत्य केल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल सदर संघावर युवा महोत्सवात सहभागी होण्यास बंदी घालण्यात येईल व होणा-या नुकसानीची भरपाई संबंधित महाविद्यालयाकडून करून घेण्यात येईल.

१० महोत्सवात सहभागी कलाकाराच्या प्रवेशिकांची नोंदणी करताना संघव्यवस्थापकांनी दहावी बोर्ड मूळ प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. अपुर्ण असलेल्या प्रवेशिका नाकारण्याचा अधिकार यजमान विद्यापीठ व महाविद्यालयास राहील.

११ मा. कुलगुरू महोदय आणि युवा महोत्सव समितीने घेतलेल्या निर्णयानुसार निकालाबाबत आक्षेप घेणे, बक्षीस वितरणावर बहिष्कार टाकणे सादरीकरणावेळी संयोजन समितीसोबत हुज्जत (वाद) घालणे किंवा युवा महोत्सवास गालबोट लावणारे प्रयत्न करणे हा प्रकार अत्यंत गंभीर स्वरूपाचा असून, संघाकडून असे वर्तन घडल्यास या बाबत कडक धोरण अवलंबण्याच्या दृष्टीने अशा महाविद्यालयांच्या संघावर कायम स्वरूपी बंदी घालण्यात येईल.

उपरोक्त सूचनांचे तंतोतंत पालन करण्याबाबत योग्य त्या सूचना आपल्याकडून संघव्यवस्थापक तसेच विद्यार्थ्यांना द्याव्यात व आपल्या विद्यापीठाचा १९ वा युवा महोत्सव २०२३-२४ यशस्वीपणे पार पाडण्यास सहकार्य करावे.

कळावे.

आपला स्नेहांकीत

**[डॉ. केदारनाथ काळवणे]**
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग

यजमान महाविद्यालयाचा पत्ता
**मा प्राचार्य**
**स्वेरीज अभियांत्रिकी महाविद्यालय,**
**गोपाळपूर-रांजनी रोड, गोपाळपूर,**
**ता पंढरपूर जि सोलापूर**
पीन ४१३३०५

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ
।। विद्यया संपन्नता ।।
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

## विद्यार्थी विकास विभाग

युवा महोत्सव

## 'उन्मेष-सृजनरंगांचा'

### नियमावली पुस्तिका

परिशिष्ट - ड

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग
## युवा महोत्सव

### स्पर्धा निहाय कलाकार, साथीदार व वेळेचे विवरण

| अ. क्र. | स्पर्धा | सहभागी कलाकारांची संख्या | | | वेळ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कलाकार | साथीदार | एकूण | किमान | कमाल | अधिकचा |
| | **संगीत** | | | | | | |
| १) | समूह गायन (भारतीय) | ६ | ३ | ९ | ८ मि. | १० मि. | ३० सेकंद |
| २) | शास्त्रीय गायन | १ | २ | ३ | १२ मि. | १५ मि. | ३० सेकंद |
| ३) | शास्त्रीय सूरवाद्य | १ | २ | ३ | १२ मि. | १५ मि. | ३० सेकंद |
| ४) | शास्त्रीय तालवाद्य | १ | २ | ३ | १२ मि. | १५ मि. | ३० सेकंद |
| ५) | सुगम गायन | १ | २ | ३ | ४ मि. | ६ मि. | १५ सेकंद |
| ६) | लोकवाद्यवृंद | ९ | ३ | १२ | ८ मि. | १० मि. | ३० सेकंद |
| ७) | समूह गायन (पाश्चात्य ) | ६ | ३ | ९ | ८ मि. | १० मि. | ३० सेकंद |
| ८) | पाश्चिमात्य गायन | १ | २ | ३ | ४ मि. | ६ मि. | १५ सेकंद |
| ९) | पाश्चिमात्य वाद्यसंगीत | १ | २ | ३ | ६ मि. | ८ मि. | १५ सेकंद |
| | **नृत्य** | | | | | | |
| १) | लोकनृत्य | १० | ५ | १५ | ८ मि. | १० मि. | ३० सेकंद |
| २) | शास्त्रीय नृत्य | १ | ३ | ४ | १२ मि. | १५ मि. | ३० सेकंद |
| | **वाङ्.मय** | | | | | | |
| १) | प्रश्नमंजुषा | ३ | – | ३ | – | – | – |
| २) | वक्तृत्व (मराठी, हिंदी, इंग्रजी) | १ | – | १ | ४ मि. | ५ मि. | १५ सेकंद |
| ३) | वाद विवाद | २ | – | २ | ४ मि. | ५ मि. | १५ सेकंद |
| ४) | काव्यवाचन | १ | – | १ | ४ मि. | ५ मि. | १५ सेकंद |
| ५) | कथाकथन | १ | – | १ | ८ मि. | १० मि. | १५ सेकंद |
| | **नाट्य** | | | | | | |
| १) | एकांकिका | ९ | ३ | १२ | २५ मि. | ३० मि. | ३० सेकंद |
| २) | प्रहसन | ६ | ३ | ९ | ८ मि. | १० मि. | ३० सेकंद |
| ३) | मुकअभिनय | ६ | २ | ८ | ४ मि. | ५ मि. | ३० सेकंद |
| ४) | पथनाट्य | १० | – | १० | ७ मि. | १० मि. | ३० सेकंद |
| ५) | नकला | १ | – | १ | ४ मि. | ५ मि. | १५ सेकंद |
| | **ललित कला** | | | | | | |
| १) | स्थळ चित्रण | १ | – | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| २) | भित्ती चित्रण | १ | – | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| ३) | व्यंग्य चित्रण | १ | – | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| ४) | माती काम | १ | – | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| ५) | कातरकाम | १ | – | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| ६) | रांगोळी | १ | – | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| ७) | निर्मितीचित्र | ४ | – | ४ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| ८) | शोभायात्रा (रॅली) | महाविद्यालयाचा संपूर्ण संघ | – | | – | – | – |
| ९) | स्थळ छायाचित्रण | १ | – | १ | २ तास | २.३० मि. | ३० सेकंद |
| १०) | मेहंदी | १ | १ | २ | २ तास | २.३० मि. | ३० सेकंद |

परिशिष्ट – अ

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

## विद्यार्थी विकास विभाग

# युवा महोत्सव

## सहभाग निश्चिती व विवरण पत्र

### नमुना फॉर्म

प्रति,
मा. संचालक,
विद्यार्थी विकास विभाग,
पुअहो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय :– युवा महोत्सव सहभाग निश्चितीबाबत.**

महोदय,

विद्यापीठस्तरीय युवा महोत्सवामध्ये आमच्या महाविद्यालयाचा सहभाग निश्चित आहे. त्यामुळे आमच्या महाविद्यालयाच्या युवा महोत्सव संघाचे पूर्ण विवरण पुढीलप्रमाणे देत आहोत.

१) महाविद्यालयाचे नांव : ____________________

२) संघ व्यवस्थापकाचे नांव : ____________________

पत्ता : ____________________

दूरध्वनी क्र.: ____________ भ्रमणध्वनी क्र.: ____________

३) सहभागी कलाकारांची एकूण संख्या : ____________

पुरूष : ____________

स्त्री : ____________

४) साथीदारांची एकूण संख्या : ____________

पुरूष : ____________

स्त्री : ____________

५) संघव्यवस्थापक /एकूण संख्या : ____________

पुरूष : ____________

महिला : ____________

६) महाविद्यालय संघातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या : पुरुष__________महिला__________

दिनांक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्राचार्य

| महाविद्यालयाचे नाव :- | | | |
|---|---|---|---|
| **आपणास ज्या कलाप्रकारात सहभागी होण्याचे आहे त्या कलाप्रकारासमोर (√) अशी खुण करावी** | | | |
| **अ क्र** | **कलाप्रकाराचे नाव** | **फी** | **सहभागाबाबत (√) शेरा** |
| **१** | **रांगोळी** | ५०/- | |
| **२** | **कातरकाम** | ५०/ | |
| **३** | **मातीकाम** | ५०/ | |
| **४** | **व्यंग्यचित्र** | ५०/ | |
| **५** | **भित्तीचित्रण** | ५०/ | |
| **६** | **स्थळचित्रण** | ५०/ | |
| **७** | **स्थळ छायाचित्रण** | ५०/- | |
| **८** | **मेहंदी** | ५०/- | |
| **९** | **वक्तृत्व (मराठी)** | ५०/ | |
| **१०** | **वक्तृत्व (हिंदी)** | ५०/ | |
| **११** | **वक्तृत्व(इग्रजी)** | ५०/ | |
| **१२** | **काव्यवाचन** | ५० | |
| **१३** | **कथाकथन** | ५० | |
| **१४** | **नकला** | ५०/ | |
| **१५** | **शास्त्रीय नृत्य** | ५०/ | |
| **१६** | **शास्त्रीय तालवाद्य** | ५०/ | |
| **१७** | **शास्त्रीय सुरवाद्य** | ५०/ | |
| **१८** | **शास्त्रीय गायन** | ५०/ | |
| **१९** | **सुगम गायन** | ५०/ | |
| **२०** | **पाश्चिमात्य गायन** | ५०/ | |
| **२१** | **पाश्चिमात्य वाद्य संगीत** | ५०/ | |
| **सांघिक कलाप्रकार** | | | |
| **२२** | **लोक वाद्यवृंद** | १००/ | |
| **२३** | **समूहगायन (भारतीय)** | १००/ | |
| **२४** | **समूह गायन (पाश्चात्य)** | १००/- | |
| **२५** | **वादविवाद** | १००/ | |
| **२६** | **प्रश्नमंजूषा** | १००/ | |
| **२७** | **निर्मीतीचित्र** | १००/ | |
| **२८** | **पथनाटय** | १००/ | |
| **२९** | **मूक अभिनय** | १००/ | |
| **३०** | **प्रहसन** | १००/ | |
| **३१** | **एकांकिका** | १००/ | |
| **३२** | **भारतीय लोक /अधिवासी नृत्य** | १००/ | |
| **३३** | **शोभायात्रा** | १००/ | |

संघव्यवस्थापकाची सही

प्राचार्याची सही
व शिक्का

| महाविद्यालयाचे नाव :- | | | | |
|---|---|---|---|---|
| युवा महोत्सवात सहभागी कलाकार संघव्यवस्थापक व साथीदार यांच्यासह एकुण ४५ कलाकारांची यादी ) | | | | |
| अ क्र | विद्यार्थ्यांचे पुर्ण नाव | पी आर एन नंबर<br>***PRN** NO. | जन्मतारीख | मोबाईल नंबर |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| १० | | | | |
| ११ | | | | |
| १२ | | | | |
| १३ | | | | |
| १४ | | | | |
| १५ | | | | |
| १६ | | | | |
| १७ | | | | |
| १८ | | | | |
| १९ | | | | |
| २० | | | | |
| २१ | | | | |
| २२ | | | | |
| २३ | | | | |
| २४ | | | | |
| २५ | | | | |
| २६ | | | | |
| २७ | | | | |
| २८ | | | | |
| २९ | | | | |
| ३० | | | | |
| ३१ | | | | |
| ३२ | | | | |
| ३३ | | | | |
| ३४ | | | | |
| ३५ | | | | |
| ३६ | | | | |
| ३७ | | | | |
| ३८ | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३९ | | | | |
| ४० | | | | |
| ४१ | | | | |
| ४२ | एकुण सहभागी मुली | | | |
| ४३ | एकुण सहभागी मुले | | | |
| ४४ | एकुण सहभागी संघव्यवस्थापक महीला | | | |
| ४५ | एकुण सहभागी संघव्यवस्थापक पुरूष | | | |
| उपरोक्त विद्यार्थ्यांच्या संदर्भातील सर्व माहीती बरोबर आहे . | | | | |
| सांस्कृतिक प्रमुख<br>सही व पुर्ण नाव मोबाईल नंबर | | | प्राचार्याची सही व शिक्का | |
| **उपरोक्त नमुना फॉर्म नुसार सहभागी फक्त विद्यार्थी कलाकर व संघव्यस्थापकाच्या नावाची बिनचुक यादी प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह विद्यापीठात प्रवेशीकेसोबत सादर करावी त्या शिवाय प्रमाणपत्र देण्यात येणार नाहीत.**<br>**(पत्रातील नियम क्र. ३ वाचा )** | | | | |
| * ज्या विद्यार्थ्यांचे पी. आर. एन. क्रं उपलब्ध नाहीत अशा विद्यार्थ्याचे जन्मतारखेचा दाखला हार्ड कॉपी सोबत जोडावे | | | | |

परिशिष्ट – ब

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

## विद्यार्थी विकास विभाग
## युवा महोत्सव

**नमुना प्रवेश पत्रक**

### मुख्य स्पर्धा प्रकाराचे नांव : संगीत/नृत्य/नाट्य/वाड्.मय/ललित कला

| अ. क्र. | कलाकार/ साथीदार यांचे नांव (आडनाव प्रथम लिहावे) | स्त्री/पुरूष | शिकत असलेला वर्ग | जन्म तारीख | सहभागी होणाऱ्या स्पर्धेचे नांव (फक्त जो विद्यार्थी कलाकार आहे त्याच्या नावापुढे लिहावीत.) | येथे फक्त साथीदारांचा विद्यार्थी, साथीदार किंवा धंदेवाईक साथीदार असा स्पष्ट उल्लेख करावा. | राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी होता काय ! केंव्हा ! | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

सांस्कृतिक विभाग प्रमुख — प्राचार्यांची स्वाक्षरी व शिक्का

परिशिष्ट – क

# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

## YOUTH FESTIVAL

Identity Certificate for Participants/ Accompanist
(Strikeout which is not applicable)

Participating College, ______________________________

______________________________

(A) 1. Name of Participant Student ______________________________
(In block letters)

2. Mother's Name ______________________________
(In block letters)

3. Date of Birth ______________________________

4. Class ______________________________

5. Item of participation ______________________________

6. Year of passing 12th of equvalent diploma ______________________________

(B) Accompanist's Name ______________________________

I. Professional/Student ______________________________

II. Standard (if student) ______________________________

(C) Address ______________________________

______________________________

Signature of Student
(Participant/ Accompanist)

Certified that particular given above are correct to the best of my knowkedge and belief.

Date: Signature of Cultural Officer Signature of the Principal with Seal

**Note: 1.** The participating student shall carry this identity certificate with him/her and shall produced it as and when neccessary for identification falling which he/she shall not beallowed to participate in the youth festival competition.
2. Submit Xerox copy of the identity certificate at the of Registration.

# विद्यार्थी विकास विभाग

## युवा महोत्सवात सर्वसाधारण विजेतेपदाचे चषक कायम स्वरुपी विजेत्या संघास देण्यासंदर्भातील नियम.

१) सलग तीन वर्षे प्रथम, द्वितीय, तृतीय सर्वसाधारण विजेतेपद मिळविणाऱ्या संघास सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक कायम स्वरूपी देण्यात येईल.

२) सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक कायमस्वरुपी देण्यासाठी विद्यापीठाच्या सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धेतील सहभाग व महाविद्यालयाच्या संघाचे, सदस्यांचे वर्तन, शिस्त व विद्यापीठाविषयीची बांधीलकी या सर्व बाबींचा विचार केला जाईल.

३) संगीत, नृत्य, नाट्य, वाङ्:मय व ललितकला या पाच कलाप्रकारातील सर्वसाधारण विजेते पदाचे चषक फिरते राहतील तथापि सलग तीन वर्षे वरील पाच प्रकारात सर्वसाधारण विजेतेपद मिळविणाऱ्या संघास कायम स्वरुपी प्रदान केले जातील.

४) सर्वसाधारण विजतेपदाचा कोणताही चषक एक वर्षासाठी ज्या संघास / महाविद्यालयास दिला आहे. त्या महाविद्यालयाने पुढील वर्षापर्यंत त्या चषकाची योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. दरम्यानच्या काळात चषकाचे नुकसान झाल्यास त्याच्या नुकसानीची भरपाई करणे हे महाविद्यालयावर बंधनकारक राहील.

संगीत विभाग (Music)

## **१. शास्त्रीय गायन** (Classical vocal solo)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.

२) प्रत्येक गायकाला किमान १२ मिनिटे व कमाल १५ मिनिटे वेळ दिला जाईल.

(३) प्रत्येक गायकास जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.

४) शास्त्रीय गायन प्रकार हिंदुस्थानी किंवा कर्नाटकी असावा.

५) स्पर्धकाने लागणारे साहित्य आपल्या बरोबर आणावे. वाद्यसंगीतामध्ये फक्त हार्मोनियम, तबला व तंबोरा आणता येईल.

६) स्पर्धेचा निर्णय रागाची निवड, स्वर, ताल, सादरीकरण आणि एकूण परिणाम यावर अवलंबून राहील.

७) स्पर्धेसाठी इलेक्ट्रॉनिक्स तानपु-याचा वापर करता येईल.

८) वादक साथीदारांची संख्या दोन पेक्षा अधिक असू नये.

९) सदर स्पर्धेत सिनेमातील शास्त्रीय गाण्यास परवानगी असणार नाही.

## **२. भारतीय शास्त्रीय सूरवाद्य** (Indian Classical Instrumentel Solo)

१) सूरवाद्यामध्ये सतार, सरोद, सारंगी, संतुर, रुद्रवीणा, व्हायोलिन, हार्मोनिअम व बासरी इत्यादी वाद्यांचा समावेश आहे.

२) स्पर्धेसाठी प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.

३) स्पर्धकांनी त्यांच्याबरोबर स्वतः ची वाद्ये आणावीत.

४) विजेवर चालणारी वाद्ये स्पर्धेसाठी वापरता येणार नाहीत.

५) स्पर्धकाला किमान १२ मिनिटे व कमाल १५ मिनिटे वेळ दिला जाईल.

६) स्पर्धकास जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.

७) स्पर्धेचा निर्णय लय, ताल, सुरेलपणा, सादरीकरण इत्यादी बाबींवर अवलंबून राहील..

८) वादक साथीदारांची संख्या दोन पेक्षा अधिक असू नये.

९) सदर स्पर्धेत हिंदुस्थानी किंवा कर्नाटकी शैलीतील सूरवाद्ये मान्य असतील.

## ३. भारतीय शास्त्रीय तालवाद्य (Indian Classical Instrumental Percussion)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकाम भाग घेता येईल.

२) प्रत्येकाला किमान १२ मिनिटे व  कमाल १५ मिनिटे वेळ दिला जाईल.

३) प्रत्येक जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.

४) स्पर्धकाने लागणारे साहित्य आपल्या बरोबर आणावे.

५) विजेवर चालणारी वाद्ये स्पर्धेसाठी निवडता येणार नाही.

६) स्पर्धेचा निर्णय ताल, लय, सुरेलपणा व सादरीकरण इत्यादी बाबीवर अवलंबून राहील.

७) तबला या वाद्याचाच समावेश होईल.

८) स्पर्धकास हिंदुस्थानी किंवा कर्नाटकी सादरीकरण करणे आवश्यक आहे.

## ४. भारतीय सुगम गायन (Indian Light Vocal Solo)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.

२) प्राथमिक तयारीसाठी स्पर्धकास ५ मिनिटे वेळ दिला जाईल.

३) प्रत्येक गायकाला किमान ४ मिनिटे व  कमाल ६ मिनिटे वेळ दिला जाईल.

४) प्रत्येक गायकास जास्तीत जास्त १५ सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.

५) स्पर्धकाने लागणारे साहित्य आपल्या बरोबर आणावे.

६) स्पर्धकास कोणतेही सूरवाद्य (उदा. हार्मोनियम, व्हायोलिन, मेंडोलिन इ.) व तालवाद्य (उदा. तबला,

७) या स्पर्धेत मराठी अथवा हिंदी भाषेतील भावगीत, भक्तीगीत, अभंग किंवा गझल सादर करता येईल.

८)  स्पर्धेचा निर्णय गाण्याची निवड, स्वर व सादरीकरण आणि एकूण परिणाम इत्यादी बाबीवर अवलंबून राहील. बोंगो, ढोलक इ.) आणता येईल.

(९) चित्रपट गीतास परवानगी दिली जाणार नाही.

१०) स्पर्धेकरीता कोणत्याही इलेक्ट्रीक वाद्याचा वापर करता येणार नाही.

११) वादक साथीदारांची संख्या दोन पेक्षा अधिक असू नये.

## ५. भारतीय समूह गायन (Indian Group Song)

(१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकच संघ पाठविता येईल.
२) समूहगीत मराठी किंवा हिंदीत सादर करता येईल.
३) चित्रपटातील समूहगीतास परवानगी दिली जाणार नाही.
४) संघ मुलांचा, मुलींचा अथवा मुला-मुलींचा असू शकेल.
५) गायनाचे मूल्य लक्षात घेऊनच निर्णय दिला जाईल. तो वेशभूषा, पोषाख अथवा हावभाव यावर अवलंबून असणार नाही.
६) दोन समूह गीतास किमान ८ मिनिटे व कमाल १० मिनिटे वेळ दिला जाईल.
७) जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद करण्यात येईल
(८) प्रत्येक संघाने दोन गीते सादर करावयाची आहेत. त्यापैकी एक देशभक्तीपर गीत व एक लोकगीत असलेच पाहिजे.
९) या स्पर्धेत तीन साथीदारांचा वापर करता येईल.
(१०) साथीदार वगळून संघात ६ स्पर्धक असतील.
११) पाश्चात्य वाद्यांचा वापर करता येणार नाही. तसेच ध्वनिमुद्रित कॅसेट, टेप अशा संगीताचा वापर करता येणार नाही.

## ६. भारतीय लोक वाद्यवृंद (Indian Folk Orchestra)

१) प्रत्येक महाविद्यालयाचा एक चमू या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.
२) संघ १२ कलावंतांचा असेल. त्यात ९ विद्यार्थी कलावंत आणि व्यावसायिक साथीदार असतील,
३) केवळ मुले/मुली किंवा मिश्र पध्दतीचा समुह यामध्ये सहभागी होऊ शकेल.
४) किमान ०८ (आठ) कमाल १० (दहा) मिनीटांचा कालावधी कलावंतांना सादरीकरणाकरिता उपलब्ध राहील
(५) जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
६) वाद्य, मंच रचनेकरिता कमाल ५ (पाच) मिनीटांचा कालावधी राहील.
(७) व्यावसायिक साथीदारांना विद्यार्थी कलावंतापासून काही अंतरावर उभे / बसून सादरीकरण करता येईल. त्यांच्या ओळखीसाठी स्वतंत्र वेशभूषा असावी.
८) लोक संगीतातील ज्या स्वरमालिकांना लोक संगीत  म्हणुन अधिकृत मान्यता आहे अशा स्वरमालिकांची प्राधान्याने निवड करण्यात यावी. सादरीकरणाकरिता उपलब्ध राहील.

## ७. पाश्चिमात्य समूहगान (Westearn Group Song)

१) प्रत्येक महाविद्यालयाचा ०१ (एक) संघ या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.

२) एका संघामध्ये किमान ४ (चार) व कमाल ६ (सहा) विद्यार्थ्यांचा समावेश राहील तथापि, गायक हे सादरीकरणादरम्यान वाद्ये वाजवू शकतील.

(३) चित्रपटगीते सादर करता येतील. समूहगान मध्ये विद्यार्थी दिलेल्या वेळेत एकापेक्षा अनेक गीते सादर करु शकतील.

४) सादरीकरणाकरिता किमान ८ मिनिटे व कमाल १० मिनिटे वेळ दिला जाईल ज्यामध्ये मंच व वाद्य रचना करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेला वेळ समाविष्ट राहणार नाही. तथापि, मंच व वाद्य रचनेकरिता ५ (पाच) मिनीटाचा अधिक कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.

(५) प्रत्येक चमूला दोन गाण्याचे सादरीकरण करावे लागेल. ज्यामध्ये एक देशभक्तीपर तर दुसरे गीत लोकसंगीतावर आधारीत राहील.

## ८. पाश्चिमात्य गायन (Western Vocal Solo)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.

२) गाणे केवळ इंग्रजी भाषेतील असावे.

३) स्पर्धक एकापेक्षा जास्त गाणे दिलेल्या वेळेत सादर करु शकतो.

(४) सादरीकरणाकरिता किमान ४ मिनिटे व कमाल ६ मिनिटे वेळ दिला जाईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.

(५) मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरिता कमाल ३ मिनीटाचा कालवधी देण्यात येईल.

६) सदर  कलाप्रकाराकरिता कमाल २ (दोन) साथीदाराचा वापर करता येईल.

(७) सिंथेसाईझर किंवा इलेक्ट्रॉनिक्स वाद्याचा सादरीकरणाकरिता वापर करता येईल.

८) चित्रपटातील गाणे गाण्यास परवानगी असेल.

(९) लय, स्वर, ताल, ठेका, रचना आणि सर्वसामान्य सादरीकरणाचा प्रभाव यावर परीक्षकांचा निर्णय आधारित राहील.

## ९. पाश्चिमात्य वाद्यसंगीत (Western Instrumental-Solo)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.

(२) सादरीकरणासाठी पाश्चिमात्य स्वरवाद्य अथवा तालवाद्य वापरता येईल.

(३) सादरीकरणाकरिता किमान ६ मिनिटे व कमाल ८ मिनिटे वेळ दिला जाईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.

(४) सदर कलाप्रकाराकरिता कमाल २ (दोन) साथीदाराचा वापर करता येईल.

५) गाणे हे एक किंवा अधिक पाश्चिमात्य शैलींचे मिश्रण असु शकते.

६) साथीदाराला सिंथेसाईझर किंवा इतर इलेक्ट्रॉनिक्स वाद्याचा सादरीकरणाकरिता वापर करता येईल.

७) मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरिता कमाल ३ (तीन) मिनीटाचा कालवधी देण्यात येईल.

८) ताल, ठेका आणि शांततेने केलेल्या सादरीकरणाचा प्रभाव यावर परीक्षकांचा निर्णय आधारित राहील.

## नृत्य विभाग

### १. भारतीय शास्त्रीय नृत्य (Indian Classical Dance)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) शास्त्रीय नृत्यामध्ये खालील नृत्य प्रकारांचा समावेश राहील. अ) भरतनाट्यम ब) कथ्थक क) कुचिपुडी द) मणिपुरी.
३) वरीलपैकी एका नृत्याचा आविष्कार स्पर्धकास सादर करता येईल.
४) प्राथमिक तयारीसाठी ५ मिनिटांचा वेळ दिला जाईल.
५) स्पर्धकास सादरीकरणासाठी किमान १२ मिनिटे व कमाल १५ मिनिटे वेळ दिला जाईल.
६) जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल
७) स्पर्धकांनी जास्तीतजास्त तीन साथीदार आणावेत.
८) चित्रपटातील शास्त्रीय नृत्ये स्पर्धेत सादर करता येणार नाहीत.
९) निर्णय हा ताल, रचना, तंत्र, अभिनय, वेशभूषा, पदन्यास आणि सर्व सामान्य परिणामावर ठरविण्यात येईल.

### २ . भारतीय लोक / आदिवासी नृत्य (Indian Folk /Traible Dance)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकच संघ पाठविता येईल.
२) भारतीय लोकसंस्कृतीतील किंवा आदिवासी संस्कृतीतील पारंपारिक लोकनृत्य असावे.
३) संघ मुलांचा, मुलीचा अथवा मुला-मुलींचा असू शकेल.
४) या स्पर्धेत भाग घेणाऱ्या कलाकारांची संख्या कमीत कमी ४ व जास्तीत जास्त १० असावी.
(५) संघाबरोबर वाद्य साथीदारांची संख्या जास्तीत जास्त ५ असावी.
६) नृत्याच्या प्राथमिक तयारीसाठी प्रत्येक संघाला फक्त १० मिनिटांचा वेळ दिला जाईल.
७) लोकनृत्य किमान ८ मिनिटांचे व कमाल १० मिनिटाचे असावे.
८) जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
९) लोकनृत्यासाठी वेशभूषा, रंगभूषा, व पार्श्वसंगीत अनुषंगिक व सुसंगत असणे आवश्यक आहे.
१०) सिनेसंगीतावर आधारीत लोकनृत्यास परवानगी नाही.
११) अश्लील व बीभत्स लोकनृत्य सादर करणाऱ्या संघावर कडक कारवाई करण्यात येईल.
१२) लोकनृत्य सादर करताना कोणत्याही प्रकारचे ध्वनिमुद्रित (टेप रेकॉर्डर, रेकॉर्ड प्लेअर, मोबाईल, पेन ड्राईव्ह, सी.डी. प्लेअर) इत्यादी साहित्यांचा वापर करता येणार नाही.
१३) सादरीकरण झाल्यानंतर ताबडतोब सादरकर्त्या संघानेच रंगमंच स्वच्छ व रिकामा करून देणे आवश्यक आहे.
१४) स्फोटके, ज्वलनशील पदार्थाचा तसेच आगीशी संबंधीत कोणत्याही वस्तूचा वापर करता येणार नाही (उदा. फटाके, ॲटमबॉम, दारुगोळा, पेट्रोल, डिझेल इत्यादी.)
१५) मूल्यमापन तालबध्दता, रचना, मुद्रा, रंगभूषा / वेशभूषा इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.
(१६) लोकनृत्यासंबंधिची पार्श्वभूमी, प्रदेश आणि नृत्याची वैशिष्ट्ये प्रतिपादन करणारी माहिती दोन प्रतिमध्ये सादर करावी.

## वाङ्मय विभाग (Literaryn Events)

### १. प्रश्न मंजुषा (Quiz)

१) प्रत्येक महाविद्यालयातून तीन विद्यार्थ्यांचा एक संघ पाठविता येईल..
२) प्रथम स्पर्धक विद्यार्थ्यांची सांघिक लेखी परीक्षा घेतली जाईल. परीक्षेचा कालावधी अर्धा तास असेल.
३) लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका विद्यापीठात तयार केली जाईल. प्रश्नपत्रिका खालील विषयावर आधारित असेल. (१) भारतीय इतिहास २) प्रचलित घडामोडी ३) क्रीडा ४) कला / साहित्य व विज्ञान ५) सामान्य विज्ञान इत्यादी.
४) लेखी स्पर्धेत गुणवत्ता यादी गुणानुक्रमे क्र. १ ते ५ मध्ये स्थान मिळविणाऱ्या स्पर्धक संघाची परीक्षा तोंडी स्परूपाची असेल व यावेळी दृकश्राव्य (Audio Visual) साधनांचा सुध्दा वापर करण्यात येईल..
५) याशिवाय नियमाबाबतचा अधिकच खुलासा स्पर्धा सुरू होण्यापूर्वी परीक्षा हॉलमध्ये करण्यात येईल.
६) तोंडी स्पर्धा ही इंग्रजी / मराठी / हिंदी या माध्यमातून होईल.

### २ वक्तृत्व (Elocution)

१) ही स्पर्धा मराठी, हिंदी, इंग्रजी या तीन भाषेत स्वतंत्रपणे आयोजित केली जाईल.
२) महाविद्यालयांना प्रत्येक भाषेतील स्पर्धेसाठी फक्त एकच स्पर्धक पाठविता येईल.
३) प्रत्येक स्पर्धकास किमान ४ मिनिटे व कमाल ५ मिनिटांचा वेळ बोलण्यास दिला जाईल जास्तीत जास्त १५ सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
४) प्रत्येक भाषेतील स्पर्धा स्वतंत्र असल्याने प्रत्येक भाषेसाठी स्वतंत्र प्रवेशिका पाठवावी.
५) वक्तृत्व स्पर्धेचे विषय संघप्रमुखाच्या बैठकीत जाहिर करण्यात येतील.

### ३. वाद -विवाद (Debate)

१) स्पर्धेसाठी विषयाच्या बाजूने व विरूध्द बाजूने बोलणाऱ्या दोन विद्यार्थ्यांचा एक संघ सहभागी असेल..
२) यात भाग घेणारे विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धेसाठी निवडलेल्या विद्याथ्र्यांपैकीच असतील.
३) या स्पर्धेत मराठी, हिंदी अथवा इंग्रजी यापैकी कोणत्याही भाषेत बोलता येईल. मात्र तिन्ही भाषेमधून स्वतंत्र क्रमांक असणार नाहीत.
(४) ही सांघिक स्पर्धा समजली जाईल
५) प्रत्येक स्पर्धकास किमान ४ मिनिटांचा व कमाल ५ मिनिटांचा वेळ बोलण्यास दिला जाईल..
(६) स्पर्धकास जास्तीत जास्त १५ सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
(७) स्पर्धेचा विषय निश्चित करून तो संघ प्रमुखांच्या बैठकीत जाहिर करण्यात येईल.

## ४. काव्य वाचन

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकच प्रवेशिका स्विकारण्यात येईल.

२) काव्यवाचन मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेमध्ये सादर करता येईल. ह्या स्पर्धेकरीता प्रत्येक महाविद्यालयास कोणत्याही एका भाषेमध्ये प्रवेशिका पाठविता येईल.

३) तिन्ही भाषेतील काव्यवाचनाचे एकत्रित मूल्यांकन करण्यात येईल. प्रत्येक भाषेकरीता स्वतंत्र स्पर्धा असणार नाही.

४) काव्य वाचनासाठी जास्तीत जास्त ५ मिनीटे वेळ देण्यात येईल.

५) कविता स्वलिखित असावी, वाङ्मयचौर्य असल्यास संघ बाद ठरविण्यात येईल.

६) कविता सादर करण्यापूर्वी कविता स्वतः हस्तक्षरात आयोजन समितीकडे लिखित स्वरुपात तीन प्रतीत जमा करणे बंधनकारक आहे.

७) कविता स्वलिखित असल्याचे (मा. प्राचार्य यांच्या यांनी साक्षांकित केलेले) हमीपत्र सादरीकरणावेळी संयोजन समितीकडे देणे बंधनकारक राहील.

## ५. कथाकथन

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकच प्रवेशिका स्विकारण्यात येईल.

२) कथा स्पर्धक विद्यार्थ्यांने स्वतः लिहिलेली असावी. तसे प्रमाणपत्र प्राचार्याने देणे आवश्यक आहे .

३) स्पर्धकास किमान ८ मिनिटे व कमाल १० मिनिटांचा वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त १५ सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.

४) कथाकथनामध्ये राष्ट्रीय व्यक्तीवर वा राष्ट्रीयत्वावर टीका तसेच चारित्र्यहनन अशा बाबींचा समावेश असता कामा नये.

५) या स्पर्धेसाठी साथीदाराची तरतूद नाही.

६) कथा फक्त मराठी भाषेतच असावी.

## नाटय विभाग (Treater Events)
## १.एकांकिका (One act play)

१) गत पाच वर्षामध्ये सोलापूर विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये सांघिक क्रमांक मिळविलेली एकांकिका सादर करता येणार नाही. तसेच वरील एकांकिका नाव बदलून अथवा काही प्रसंग बदलून सादर करता येणार नाही. सोलापूर विद्यापीठाच्या युवा महोत्सवामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक प्राप्त एकांकिका पून्हा त्या पारितोषीक विजेत्या संघास सादर करता येणार नाही.

२) एकांकिका मराठी अथवा हिंदी भाषेत असावी. परंतु एका महाविद्यालयास वरील पैकी एकाच भाषेतील फक्त एकाच एकांकिकेसाठी प्रवेशिका पाठविता येईल.

३) एकांकिका मराठी/ हिंदी भाषेत असू शकेल. परंतु नाटकाचा अंक प्रवेश सादर करता येणार नाही.

(४) प्रयोगास किमान २५ मिनिटांचा व कमाल ३० मिनिटांचा वेळ दिला जाईल. प्राथमिक तयारीसाठी १५ मिनीटांचा वेळ दिला जाईल असे एकूण ४५ मिनीट दिले जातील. रंगमंच आपल्या संघाला ताब्यात दिल्यानंतर आपली वेळ सुरु होईल. ४५ मिनीटात संघाला प्राथमिक तयारीसह प्रयोग पूर्ण करावा लागेल. अन्यथा एकांकिका स्पर्धेतून बाद करण्यात येईल.

५) प्रयोगास जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.

६) एकांकिका स्पर्धेत भाग घेणारा संघ संपूर्ण मुलांचा अथवा मुलींचा अथवा संमिश्र असला तरी चालेल. परंतु पुरूषांची भूमिका पुरुषांनेच आणि स्त्रियांची भूमिका स्त्रियांनीच करावी. (महिला महाविद्यालये या नियमास अपवाद असतील.)

७) एकांकिकेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांची संख्या ९ पेक्षा जास्त असू नये.

८) सर्वसाधारण प्रवेश योजना व सामान्यतः लागणारे फर्निचर सारखे साहित्य संयोजक महाविद्यालयातर्फे पुरविण्यात येईल. परंतु काही विशिष्ट साहित्य लागत असल्यास त्याची व्यवस्था संघानेच करावी.

९) एकांकिकेच्या सादरीकरणासाठी संबंधित लेखकाची लेखी परवानगी आवश्यक आहे.

१०) एकांकिका सादर करण्यापूर्वी लेखकाची लेखी परवानगी पत्र व एकांकिकेची संहिता याच्या तीन प्रती परीक्षकांकडे सादर करणे आवश्यक आहे.

(११) साथीदारांची संख्या ३ पेक्षा जास्त असू नये.

(१२) एकांकिकेचे मूल्यमापन मुख्य विषयाची निवड, अभिनव, रंगभूषा आणि प्रेक्षकांवरील एकंदर परिणाम इत्यादी बाबीवर अवलंबून राहील.

(१३) वेळापत्रकानुसारच संबंधित महाविद्यालयाने प्रयोग सादर करणे आवश्यक व बंधनकारक आहे.

## २. प्रहसन (Skit)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकच प्रवेशिका स्विकारण्यात येईल.
२) लघुनाटिका मराठी / हिंदी भाषेत असावी.
३) स्पर्धक विद्यार्थ्यांची संख्या जास्तीत जास्त ६ राहील.
४) सादरीकरणासाठी किमान ८ मिनिटे व कमाल १० मिनिटांचा वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
५) नाटिकेमध्ये राष्ट्रीय व्यक्तीवर व राष्ट्रीयत्वावर टीका तसेच चारित्र्यहनन अशा बाबींनचा समावेश असता कामा नये.
६) स्पर्धकांना रंगभूषा, वेषभूषा, प्रकाश योजना व पार्श्वसंगीत यांचा वापर करता येईल.
७) सादरीकरणासाठी विषय ज्या त्या महाविद्यालयांनी निवडायचा आहे. राष्ट्रीय एकात्मता, अंधश्रध्दा निर्मूलन व सामाजिक समस्या अशा विषयांना प्राधान्य द्यावे. नाटिका विनोदी, विडंबनात्मक, उपरोधात्मक असावी. मात्र ती टीकात्मक असू नये.
८) स्पर्धेचा निकाल विषयाची निवड, अभिनय, संरचना, प्रेक्षकांवरील परिणाम इत्यादी बाबीवर अवलंबून राहील.
९) साथीदारांची संख्या जास्तीत जास्त ३ असेल.

## ३. मूक अभिनय (Mime)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकच संघ पाठवता येईल.
२) मूकअभिनय ही शब्दविरहीत, अभिनय, हावभाव, पवित्रा आणि मुद्राभिनव यातून व्यक्त करावयाची कला आहे.
३) स्पर्धक विद्यार्थ्यांची संख्या जास्तीत जास्त ६ राहील.
४) सादरीकरणासाठी किमान ४ मिनिटे व कमाल ५ मिनिटांचा वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल / त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
५) संघ मुलांचा, मुलीचा अथवा संमिश्र असू शकेल.
६) मूक अभिनय सादरीकरणासाठी कोणत्याही वस्तूची किंवा इतर साहित्याची परवानगी नाही.
७) ध्वनिमुद्रित केलेले पार्श्वसंगीत वापरण्यास परवानगी आहे.
८) स्पर्धेचा निकाल विषयाची निवड, संगीत, सादरीकरणातील संकल्पना, रंगभूषा, वेषभूषा व प्रेक्षकांवरील परिणाम इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.
९) साथीदारांची संख्या जास्तीत जास्त २ असेल.
१०) वेशभूषेसाठी फक्त पांढऱ्या किंवा काळ्या रंगाचे कपडे वापरावेत.

## ४ नकला (Mimicry)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) स्पर्धकास सादरीकरणासाठी किमान ४ मिनिटे व कमाल ५ मिनिटे वेळ दिला जाईल.
(३) जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल..
(४) स्पर्धकास विविध आवाजाची व प्रसिध्द व्यक्तींच्या भाषणाची नक्कल करता येईल. यामध्ये चित्रपट सृष्टीतील व्यक्तिमत्त्वाचा ही समावेश असेल..
५) स्पर्धेचे मूल्यमापन नक्कल कौशल्य, आवाजाची विविधता, शब्दोच्चाराचे अनुकरण व सादरीकरण यावर अवलंबून राहील.

## ५ पथनाट्य (Street Play)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकच संघ पाठवायचा आहे.
२) पथनाटय् मराठी भाषेत असावे. स्पर्धकांची संख्या जास्तीत जास्त १० राहील.
३) सादरीकरणासाठी किमान ७ मिनिटे व कमाल १० मिनिटे वेळ दिला जाईल.
४) जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
५) पथनाट्यामध्ये राष्ट्रीय व्यक्तीवर व राष्ट्रीत्वावर टिका तसेच चारित्र्यहनन अशा बाबींचा समावेश असता कामा नये.
६) सादरीकरण पथनाट्याच्या पध्दतीने म्हणजे रंगभूषा, वेशभूषा, ध्वनिमुद्रित पार्श्वसंगीत यांना फाटा देऊन व्हावे. मात्र पात्रांना वाद्य वापरायला परवानगी आहे.
७) सादरीकरणासाठी विषय ज्या त्या महाविद्यालयांनी निवडायचा आहे. राष्ट्रीय एकात्मता, स्त्रीभ्रूणहत्या, भ्रष्टाचार, पर्यावरण, अंधश्रध्दा निर्मूलन व सामाजिक समस्या अशा विषयांना प्राधान्य द्यावे.
८) संघ मुलांचा, मुलींचा किंवा संमिश्र असू शकेल.

# ललित कला विभाग (Fine Arts)

## १ स्थळचित्रण (On the Spot Painting)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) स्पर्धा प्रमुख, स्पर्धकास ज्या ठिकाणी घेऊन जातील त्या ठिकाणी सूचविण्यात आल्याप्रमाणे जागेवर चित्रण करावयाचे आहे.
३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.
४) या कलाप्रकारासाठी वाढीव वेळेची तरतूद नाही.
(५) चित्राचा आकार २२ X १५" असेल.
६) चित्रणासाठी कोणत्याही प्रकारचे (ऑईल, वॉटर, पेस्टल इत्यादी) रंग वापरता ७) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावे.
(८) संयोजकांमार्फत फक्त कागद पुरविला जाईल.

## २. व्यंगचित्र (Cartooning)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धा भाग घेता येईल.
२) व्यंगचित्रणासाठी विषय आयत्या वेळी देण्यात येईल.
३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.
४) या कलाप्रकारासाठी वाढीव वेळेची तरतूद नाही.
५) चित्राचा आकार २२ X १५" असेल.
६) चित्रणासाठी कोणत्याही प्रकारचे (ऑईल, वॉटर, पेस्टल इत्यादी) रंग वापरता येईल.
७) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावे.
८) संयोजकामार्फत फक्त कागद पुरविला जाईल.

## ३ भित्तीचित्र (Poster Making)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) भित्तीचित्रणासाठी विषय आयत्या वेळी देण्यात येईल.
(३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.
४) या कलाप्रकारासाठी वाढीव तरतूद नाही.
५) चित्रणासाठी कोणत्याही प्रकारचे (ऑईल, वॉटर, पेस्टल इत्यादी) रंग वापरता येतील.
६) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावे.
७) संयोजकांमार्फत फक्त कागद पुरविला जाईल.

## ४ कातरकाम (Collage)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.

२) स्पर्धेच्या ठिकाणीच वस्तुची निर्मिती करावयाची आहे.

३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.

४) या कलाप्रकारासाठी वाढीव वेळेची तरतूद नाही.

५) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावे.

६) संयोजकांमार्फत फक्त कागद पुरविला जाईल.

## ५ मातीकाम (Clay Modelling)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.

२) स्पर्धेचा विषय आयत्या वेळी देण्यात येईल.

३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.

४) या कलाप्रकारासाठी वाढीव वेळेची तरतूद नाही.

५) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावे.

६) संयोजकांद्वारे फक्त क्ले (माती) पुरविली जाईल.

## ६. रांगोळी (Rangoli)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.

२) स्पर्धेचा विषय आयत्या वेळी देण्यात येईल.

३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.

४) या कलाप्रकारासाठी वाढीव वेळेची तरतूद नाही.

५) स्पर्धेतील रांगोळीची दृष्यरचना मुक्तहस्त, वर्णनात्मक व हेतू व्यक्त करणारी असावी.

६) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावे.

## ७. स्थळ छायाचित्रण (Spot Photography)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकच प्रवेशिका स्विकारण्यात येईल.

२) स्पर्धकास आयत्यावेळी विषय दिला जाईल. व त्याप्रमाणे त्यांनी पाच (५) उत्कृष्ट फोटो डिजीटल कॅमेराने काढावेत. कॅमेऱ्यामधील मेमरी कार्ड हे परिक्षक स्पर्धा सुरू होण्यापुर्वी फॉरमॅट (Format) करतील व त्यानंतरच फोटो काढावेत.

३) काढलेल्या छायाचित्रांबरोबर कोणत्याही प्रकारची छेडछाड (उदा. मार्किंग, मिक्सिंग, फोटो एनहान्सिंग इत्यादी) स्पर्धकाला अपात्र ठरवू शकते.

४) सदर स्पर्धेदरम्यान काढलेले छायाचित्रे विद्यापीठ व यजमान महाविद्यालय कोणत्याही कारणास्तव पूर्वसूचनेशिवाय वापरू शकते.

५) स्पर्धकाने स्वतःचा कॅमेरा आणावयाचा आहे. सदर कॅमेरा डिजीटल असावा.

६) प्रत्येक स्पर्धकाला किमान २ तास व कमाल २.३० तासांचा वेळ दिला जाईल.

७) जास्तीत जास्त ३० सेंकदाचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.

८) अधिकच्या सूचना स्पर्धेच्या वेळेस करण्यात येतील

## ८. मेंहदी (Mehendi)

(१) प्रत्येक महाविद्यालयातून एकच प्रवेशिका स्वीकारण्यात येईल
२) स्पर्धकाने आवश्यक ते साहित्य स्वत: आणावेत
३) स्पर्धकाने साथीदाराच्या हाताच्या दोन्ही तळहातावर मेंहदी काढावयाची आहे
४) एकच साथीदार मान्य असेल आणि सदर साथीदार स्पर्धकाच्याच महाविद्यालयातील विद्यार्थी असावा
५) मेहंदीसाठी कोणत्याही प्रकारचे छापील अथवा कृत्रिम (हात) मान्य असणार नाही
६. प्रत्येक स्पर्धकाला किमान २ तास व कमाल २.३० तासांचा वेळ दिला जाईल.

## ९. निर्मितिचित्र (Installation)

१) प्रत्येक महाविद्यालयातून किमान ०३ (तीन) व कमाल ०४ (चार) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकतील. स्पर्धास्थळी करावे लागेल.

२) प्रत्येक महाविद्यालयीन संघाला परिक्षकाने / आयोजकांनी दिलेल्या विषयावर आधारित निर्मितीचित्र
(३) इंस्टालेशन हे ५ X ५ X ५ फूट पेक्षा मोठे नसावे व प्रत्येक महाविद्यालयाच्या संघाने एकच निर्मितीचित्र सादर करावे.
४) वेळ मर्यादा ही २ तास ३० मिनीटांची राहील.
५) सहभागी स्पर्धक इतर सर्व ललितकला संबंधीत सर्व कला प्रकारांसाठी लागणाऱ्या साहित्यांचा वापर करु शकतात.
६) सहभागी स्पर्धक परिसरातील टाकाऊ वस्तू किंवा बाहेरुन उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही साहित्याचा वापर करु शकतात.

७) सहभागी स्पर्धकाने बाजारपेठेत तयार असलेल्या कुठल्याही वस्तूचा वापर करण्यास मनाई असेल.. ते त्यांची कलाकृती ही कच्च्या मालापासून तयार करु शकतात.
८) निर्मितीचित्र परिक्षण हे बोलकेपणाची कामाची हातोटी सादरीकरण व सर्वसमावेशक प्रभाव यावर आधारित असेल.

## १०. शोभा यात्रा (Rally)

१) प्रत्येक महाविद्यालयाचा एक संघ असेल.
२) संघ मुलांचा, मुलींचा अथवा मुला-मुलींचा असू शकेल.

३) युवा महोत्सवासाठी सहभागी संघातीलच विद्यार्थी शोभायात्रेमध्ये सहभागी होऊ शकतील.

४) शोभायात्रेसाठी विद्यापीठाकडून तीन विषय दिले जातील. त्यातील एका विषयावर महाविद्यालयाने संघ तयार करावयाचा आहे.
(५) विषयाला न्याय देणारी वेशभूषा, वाद्य, कथानक, सादरीकरणाचा एकूण प्रभाव इत्यादी बाबींवर शोभायात्रेचे मूल्यांकन अवलंबून असेल.

## गोल्डन बॉय व गोल्डन गर्ल

गोल्डन बॉय व गोल्डन गर्लसाठी सांधिक व वैयक्तिक कलाप्रकारातील प्रमुख व्यक्तिरेखा साकारणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीचाच परीक्षकांच्या शिफारशीने विचार केला जाईल.

* गोल्डन बॉथ व गोल्डन गर्लसाठी खालीलप्रमाणे गुणांकन पध्दती असेल.

| | | |
|---|---|---|
| सांघिकमध्ये | प्रथम क्रमांक | ३ गुण |
| | द्वितीय क्रमांक | २ गुण |
| | तृतीय क्रमांक | १ गुण |
| वैयक्तिक :- | प्रथम क्रमांक | ३ गुण |
| | व्दितीय क्रमांक | २ गुण |
| | तृतीय क्रमांक | १ गुण |

१.गोल्डन बॉय व गोल्डन गर्लसाठी परीक्षकांच्या शिफारशी प्राधान्याने विचारात घेतल्या जातील.

२.सर्वसाधारण विजेतेपदासाठी हे गुण विचारात घेतले जाणार नाहीत.

३.गोल्डन बॉय व गोल्डन गर्लसाठी ज्या विद्यार्थी कलावंतास सर्वाधिक गुण असतील, त्यास हे पारितोषिक दिले जाईल.

४· विद्यार्थी कलाकार आपल्या महाविद्यालयाच्या इतर कलाप्रकारास साथ संगत देऊन विजयी करण्यास मदत करत असेल तर त्यांचा ही विचार करण्यात येईल.

५· विद्यार्थी कलाकाराचे वर्तन प्रामुख्याने पाहण्यात येईल.

६. याशिवाय यासंदर्भातील अंतिम निर्णय युवा महोत्सव समितीकडे राखीव असेल.

## महत्वाचे नियम

*** प्रवेश शुल्क**

युवा महोत्सवामध्ये भाग घेण्याकरिता विद्यापीठाने खालीलप्रमाणे शुल्क ठरविले आहे.

१) प्रत्येक सांघिक स्पर्धेकरिता रु. १००/-

२) प्रत्येक वैयक्तिक स्पर्धेकरिता रु. ५०/-

स्पर्धक महाविद्यालयाने आपण भाग घेतलेल्या एकूण स्पर्धेच्या संख्येच्या प्रमाणात प्रत्येक सांधिक / वैयक्तिक स्पर्धेप्रमाणे आवश्यक त्या शुल्काची रक्कम मा. वित्त अधिकारी, पु अ हो सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या नावे ऑनलाईन पाठविण्यात यावे प्रवेश शुल्काचा भरणा विद्यापीठाच्या कार्यालयात केल्याशिवाय प्रवेश अर्ज स्विकारण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी

*** स्पर्धकांचा प्रवास खर्च व भोजन व्यवस्था**

युवा महोत्सवात भाग घेणाऱ्या संघातील विद्यार्थी कलाकाराचा व संघ प्रमुखांचा महाविद्यालयापासून स्पर्धेच्या ठिकाणापर्यंत जाण्यायेण्याचा प्रवास खर्च व इतर खर्च ज्या त्या महाविद्यालयांनी करावयाचा असून त्यांच्या निवासाची व्यवस्था यजमान महाविद्यालयाच्या वतीने करण्यात येईल. संघव्यवस्थापक व स्पर्धकांची भोजन व्यवस्था यजमान महाविद्यालयाकडून करण्यात येईल.

*** संघव्यवस्थापक**

प्रत्येक महाविद्यालयाच्या संघाबरोबर एक प्राध्यापक / प्राध्यापिका व १० विद्यार्थी संख्येच्या पुढे दोन संघव्यवस्थापक मान्य केले जातील. संघ व्यवस्थापकांनी आपला दैनिक भत्ता व प्रवास खर्च आपल्या महाविद्यालयाच्या फंडामधून करावयाचा आहे.

* स्पर्धकांची पात्रता

सोलापूर विद्यापीठातील सर्व संलग्न महाविद्यालये / संस्था तसेच सर्व प्रमाणित पदवी, पदव्युत्तर वर्गात पूर्णवेळ शिकत असणाऱ्या व कमीत कमी एक वर्ष मुदतीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना युवा महोत्सव स्पर्धेमध्ये भाग घेता येईल प्रोव्हिजन ॲडमिशन मान्य केले जाणार नाही.

स्पर्धकाचे वय स्पर्धेच्या तारखेस २५ वर्षापेक्षा कमी असावे. वय २५ वर्षे पूर्ण असल्यास स्पर्धक अपात्र ठरेल. सहभागी होणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीने विद्यापीठात / महाविद्यालयात प्रवेश घेऊन सात वर्षापेक्षा अधिक काल उलटून गेला असल्यास असा विद्यार्थी/ विद्यार्थीनी भाग घेऊ शकणार नाही. संघव्यवस्थापकाने स्पर्धकांचे वयाचे पुरावे मुळ पत्र नोंदणीवेळी आणने आवश्यक आहे. ( S.S.C. बोर्डस् सर्टिफिकेट )

*** संघाची क्षमता**

१) संघातील एकूण स्पर्धकांची संख्या ही सहभागी विद्यार्थी स्पर्धक २ संघव्यवस्थापक व व्यावसायीक वादक यांच्या एकूण बेरजेसह कमाल ४५ इतकी असणे बंधनकारक राहील.

२) आयोजक महाविद्यालयाच्या सुविधांची व साधनांची संघातील सहभागी स्पर्धकाने, साथीदाराने, व्यावसायीक साथीदाराने कोणत्याही स्वरूपाचे नुकसान केल्यास संबंधीत महाविद्यालयाकडून त्याची भरपाई करुन देणे बंधनकारक राहील.

*** साहित्य**

प्रत्येक स्पर्धेत भाग घेण्यासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी आपल्या बरोबर आणावे. संयोजकाकडून कोणतेही साहित्य पुरविले जाणार नाही.

**कपडे /बिछाने**

स्पर्धकांनी त्यांना आवश्यक असणारे कपडे / बिछाने आपल्या बरोबर आणावेत संयोजक कपड़े / बिछाने पुरविले जाणार नाहीत.

*** सर्वसाधारण विजेतेपद**

सहभागी महाविद्यालयातून सर्वसाधारण विजेतेपदासाठी महाविद्यालयाचे नाव निवडताना त्या महाविद्यालयाने सांधिक व वैयक्तिक स्पर्धामध्ये मिळविलेल्या एकूण गुणांचा विचार केला जाईल . गुणांकन पद्धती खालीलप्रमाणे असेल.

| * वैयक्तिक * | | * सांधिक स्पर्धा * | |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | ५ गुण | प्रथम क्रमांक | ७ गुण |
| व्दितीय क्रमांक | ३ गुण | व्दितीय क्रमांक | ५ गुण |
| तृतिय क्रमांक | १ गुण | तृतिय क्रमांक | ३ गुण |

प्रत्येक कलाप्रकारासाठी (सांधिक / वैयक्तिक) प्रथम, व्दितीय व तृतीय असे तीन क्रमांक देण्यात येईल. फक्त विजेत्या संघांनाच स्मृतीचिन्हे व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येईल.

**सर्वसाधारण विजेतेपदासाठी सर्व सांधिक व वैयक्तीक कलाप्रकारांना वरीलप्रमाणे समान गुण देण्यात येतील. एकांकिका कलाप्रकारातून निवडण्यात आलेल्या उत्कृष्ट स्त्री व पुरुष अभिनय तसेच संपव्यवस्थापक, गोल्डन बॉय, गोल्डन गर्ल या पारितोषिकाचे गुण सर्वसाधारण विजेतेपदासाठी विचारात घेतले जाणार नाहीत.**

| | |
|---|---|
| 'उत्कृष्ट अभिनय (पुरुष) | प्रथम, व्दितीय, तृतीय असे पुरस्कार देण्यात येतील |
| * उत्कृष्ट अभिनय (स्त्री) | प्रथम, व्दितीय, तृतीय असे पुरस्कार देण्यात येतील |
| उत्कृष्ट संघव्यवस्थापक | प्रथम, व्दितीय, तृतीय असे पुरस्कार देण्यात येतील |
| गोल्डन बॉय | सर्वोत्कृष्ट एक विद्यार्थी कलाकार |
| गोल्डन गर्ल | सर्वोत्कृष्ट एक विद्यार्थीनी कलाकार |

* **सादरीकरणाच्या वेळेची नोंद**

सहभागी महाविद्यालयातील संघप्रमुखांनी त्यांच्या संघाच्या प्रत्येक कलाप्रकाराचे सादरीकरण करण्यापूर्वी ५ मिनिटे अगोदर वेळाधिकाऱ्याशी (टाईम किपरशी) संपर्क साधावा. संघप्रमुखाने सादरीकरणाच्या प्रारंभीची व समाप्तीच्या वेळेची नोंद घेऊन स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे.

*** सादरीकरण**

सर्व सांधिक / वैयक्तिक स्पर्धा प्रकारांमध्ये किमान ५ संघाच्या सादरीकरणाशिवाय ती स्पर्धा ग्राह्य धरली जाणार नाही. मात्र किमान तीन संघांचे सादरीकरण झाल्यास केवळ एका क्रमांकाचा पुरस्कार दिला जाईल.

* **तक्रार निवारण**

स्पर्धक कलाकारांनी आपल्या तक्रारी संबंधित व्यवस्थापक प्राध्यापकांमार्फत युवा महोत्सव समितीकडे रू. १००/- तक्रार निवारण शुल्क भरून लेखी सादर कराव्यात. सदर शुल्काचा परतावा होणार नाही. तक्रारी संदर्भात विद्यापीठ युवा महोत्सव समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल. तक्रार अर्जाचा नमुना सोबत जोडलेला आहे.

**इंद्रधनुष्य व पश्चिम विभागीय युवा महोत्सव संघ**

इंद्रधनुष्य व पश्चिम विभागीय युवा महोत्सवाकरिता संघ निवडिचे सर्व अधिकारी विद्यापीठाला असतील. महोत्सवासाठी संघ निवडताना आंतरमहाविद्यालयीन युवा महोत्सवात सांधिक व वैयक्तीक कलाप्रकारात प्रथम, द्वितीय व तृतीय आलेले संघ आहे तसे निवडले जाणार नाहीत. त्यासाठी स्वतंत्र निवडप्रक्रिया केली जाईल. काही कारणाने आंतरमहाविद्यालयीन युवा महोत्सवात सहभागी न होऊ शकलेला विद्यार्थी कलावंत इंद्रधनुष्य व पश्चिम विभागीय युवा महोत्सवात मा. कुलगुरु नामनिर्देशित निवड समितीच्या शिफारशीवरुन सहभागी होण्यास पात्र राहील. मागील वर्षी इंद्रधनुष्य, पश्चिम विभागीय आणि राष्ट्रीय युवा महोत्सवात बक्षीस प्राप्त विद्यार्थी कलावंताला चालू शैक्षणिक वर्षातील सर्व युवा महोत्सवाच्या संघात निवड चाचणीविना थेट सहभागी करुन घेतले जाईल.

* **स्पर्धेसंबंधीचे इतर नियम**

१) प्रत्येक विद्यार्थी कलाकाराने सोबतच्या नमुन्यातील ओळखपत्र सतत जवळ बाळगले पाहिजे. ओळखपत्र दाखविल्याशिवाय स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

२) सर्व विद्यार्थी / विद्यार्थीनींनी सर्व कार्यक्रमांना वेळेवर उपस्थित राहिले पाहिजे.

३) स्पर्धा सुरू होण्यापूर्वी नियोजित स्थळी स्पर्धकांनी १० मिनिटे अगोदर उपस्थित रहावे.

४) स्पर्धकांना लॉटमध्ये जाहीर झालेल्या क्रमांकानेच भाग घेता येईल ऐनवेळी यामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही.

५) कोणत्याही वाद्यांचा, वस्तूंची अगर साहित्यांची मोडतोड केल्यास त्याची भरपाई संबंधित व्यक्तिकडून करून पेवली जाईल.

६) संयोजकाच्या पूर्व परवानगी शिवाय स्पर्धक विद्यार्थी-विद्यार्थीनीस महोत्सव परिसर सोडता येणार नाही.

७) स्पर्धेच्या ठिकाणी सर्व स्पर्धकांनी शिस्तीचे काटेकोर पालन करावयाचे आहे. बेशिस्त वर्तन करणाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल.

८) संगीत, नृत्य, नाट्य या सर्व स्पर्धेतील सहभागी संघाची किंवा वैयक्तिक स्पर्धेतील एकूण साथीदारांची संख्या ९ पेक्षा अधिक असू नये याची नोंद घ्यावी.

९) व्यावसायिक साथीदारांची संख्या ३ पेक्षा अधिक असू नये. व्यावसायिक साथीदारांची नोंद 'विद्यार्थी' असा करू नये. तसे आढळल्यास ते गैरशिस्तीचे वर्तन मानले जाईल. इयत्ता ११ वी व १२ वी मधील विद्यार्थी साथीदार हा व्यावसायिक साथीदार मानला जाईल.

१०) कोणत्याही वादग्रस्त विषयाबाबत प्रसार माध्यमाकडे जाता येणार नाही. ते गैरशिस्तीचे वर्तन मानण्यात येईल.

११) परीक्षक मंडळानी घेतलेले निर्णय अंतिम व बंधनकारक असतील.

१२) शोभायात्रेच्या व इन्स्टॉलेशन मधील प्रथम, व्दितीय, तृतीय पारितोषिकाचे नियमानुसार गुण सर्वसाधारण विजेतेपदासाठी ग्राह्य मानले जातील. तसेच ही स्पर्धा सांघिक प्रकारामध्ये ग्राह्य धरली जाईल.

१३) युवा महोत्सवामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थी कलाकारांनी आपल्या जन्म तारखेची नोंद असलेली माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची किंवा एस. एस. सी. बोर्ड सर्टिफिकेटची सत्यप्रत प्रवेशिकेसोबत जोडणे बंधनकारक आहे.

१४) सादरीकरणादरम्यान संघास काही अडचण आल्यास केवळ संघव्यवस्थापकांनीच युवा महोत्सव समितीकडे संपर्क करावा. प्रशिक्षक, वादक, साथीदार, विद्यार्थी यांनी यजमान महाविद्यालय, संयोजन समिती व युवा महोत्सव समिती सदस्यासोबत वाद करु नये. असे आढळल्यास संघ बाद करण्यास येईल.

परिशिष्ट – इ

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग
# युवा महोत्सव

## तक्रार निवारण अर्ज
नमुना फॉर्म

प्रति,
मा. संचालक,
विद्यार्थी विकास विभाग,
पुअहो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

विषय : तक्रार निवारण अर्ज

महोदय,
________________________________________
________________________________________
________________________________________
________________________________________

(तक्रारीचा तपशील)

आपला विश्वासू
(संघ प्रमुखाचे नांव व स्वाक्षरी)
फोन नं.
(महाविद्यालयाचे नांव)

(कृपया वरील तपशील त्वरीत पाठवावा.)